# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crime**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **13/03/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन रिसोड हद्दीतील ग्राम वाडी वाकद येथील आरोपीने आपल्या एक वर्षाच्या मुलीला जिवंत खड्ड्यात पुरून जिवंत मारले असून यातील आरोपीस तत्काळ अटक करण्यात आली आहे.

**अकोला/शनिवार, दि.१२ मार्च २०२२**

## पती -पत्नीच्या भांडणात पतीचा राग अनावर

# पोटच्या मुलीला जिवंत गाढले !

## ▪ आरोपी अटकेत ▪ मृतदेहाची होणार फॉरेन्सीक तपासणी

प्रतिनिधी १२ मार्च

**रिसोड :** चारित्र्यावर संशय घेऊन पत्नी सोबतच्या भांडणात राग अनावर झालेल्या निर्दयी बापाने आपल्या १ वर्षीय मुलीला खड्ड्यात जिवंत पुरून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यातील वाडी वाकद गावात रात्रीच्या सुमारास घडली. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या घटनेमुळं एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार वाडी वाकद येथील सुरेश घुगे व त्यांची पत्नी कावेरी घुगे हे गावाशेजारील शेतात राहत असून रात्री यां दोघामध्ये कडाक्याचं भांडण झालं.यामध्ये सुरेश ने पत्नीला बेदम मारहाण केली.

त्यामुळं पत्नी इतर नातेवाईकांना बोलवण्यासाठी गेली असता सुरेश घुगे याने त्याचा राग मुलगी लक्ष्मीवर काढला व शेतात खड्डा करून तिला जिवंत पुरत हत्या केली.रिसोड तालुक्यातील वाडी वाकद शेत शिवारात असलेल्या सुरेश घुगे याने पती पत्नीच्या भांडणात आपल्या १ वर्षीय लक्ष्मी नावाच्या मुलीला खड्ड्यात जिवंत पुरून तिची हत्या केली आहे. घटनास्थळ गाठत पुरलेला मृतदेह उकरून तो फॉरेन्सिक तपासणीसाठी





पाठविला आहे. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सुरू असल्याचं रिसोडचे ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांनी सांगितलं आहे.